**सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना-अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी २६२५/प्र.क्र.४१/कौशल्य-२**

खोली क्र. ४३५, चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० जुलै, २०२५

**<u>वाचा</u>** : १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४, दिनांक १० मे, २०१८.

२) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक २० जून, २०२३.

३) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३.

४) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२४/प्र.क्र.२५/कौ-२, दिनांक १४ मार्च, २०२४.

५) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२४/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक ०६ जून, २०२४

६) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु.मान्यता/२०२५/२०, दि.२१ मे, २०२५.

७) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु. मान्यता/२०२५/प्र.क्र. ४०/२७ व २८, दि.२७ मे, २०२५.

८) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु.मान्यता/२०२५/प्र.क्र. ४०/२९, दि.२८ मे, २०२५.

९) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक ३० मे, २०२५.

१०) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु.मान्यता/२०२५/प्र.क्र. ४०/३३, दि.१० जून, २०२५.

११) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु.मान्यता/२०२५/प्र.क्र. ४०/३४, दि.१६ जून, २०२५.

१२) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २६२५/प्र.क्र.६२/कौ-२, दिनांक ०७ जुलै, २०२५.

**<u>प्रस्तावना :</u>**

पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील द्विलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर

व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यासाठीच्या ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दतीस संदर्भ क्र. १ येथील दि. १०.०५.२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत सद्यस्थितीत सुरु असणारे +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम बंद करून राष्ट्रीय व्यवसाय आराखडयाप्रमाणे ( National Skill Qualification Framework ) नवीन अभ्यासक्रम सर्व शासकीय, अशासकिय अनुदानित व अशासकिय कायम विनाअनुदानित संस्थामध्ये शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सुरु करण्यास संदर्भ क्र. २ येथील दि. २०.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत आली आहे. तसेच सदर नवीन अभ्यासक्रमांची अमंलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व सुधारीत मानकांना संदर्भ क्र. ३ येथील दि.१४.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यानुसार राज्यात शासकीय, अशासकीय अनुदानित व अशासकीय कायम स्वरुपी विनाअनुदानित संस्थांमधील सद्यस्थितीत सुरु असणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी सुधारीत NSQF रूपांतरीत नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांना शाळा / संस्थानिहाय मान्यता संदर्भ क्र. ४ येथील दि. १४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे. तथापि, संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये NSQF रूपांतरीत नवीन व्यवसाय अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०२४-२५ राबविण्यास स्थगिती देण्यात आली. तदनंतर संदर्भ क्र. ९ येथील शासन निर्णयान्वये सदर स्थगितीस शैक्षणिक सत्र २०२५-२६ व २०२६-२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यासाठी ज्या संस्थानी / महाविद्यालयांनी नवीन किंवा अधिकच्या तुकडयांना कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यात आले आहेत, त्यांना त्यासंबंधीचे मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून सदर अभ्यासक्रम राबविता येतील, असे नमूद करण्यात आले आहे.

+२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयाकरीता निरीक्षण समिती मार्फत प्राप्त झालेल्या अर्जाची संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई स्तरावर छाननी करून संचालनालयाकडून योग्य त्या शिफारशीसह प्रस्ताव संदर्भ क्र.६ येथील दिनांक २१ मे, २०२५, संदर्भ क्र.७ येथील दिनांक २७ मे, २०२५ व संदर्भ क्र. ८ येथील दि. २८ मे, २०२५ संदर्भ क्र. १० येथील दि. १० जून, २०२५, संदर्भ क्र. ११ येथील दि. १६ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शैक्षणिक संस्थांकडून ऑनलाईन प्रणालीद्वारेव्दारे प्राप्त दस्तावेजांची छाननी करुन त्यानुसार आवश्यक मानकांची पुर्तता करणाऱ्या ६९ संस्थांच्या एकूण ९४ तुकडयांना +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांना मान्यता देण्याकरीता संचालनालयाकडून शिफारस करण्यात आली आहे. त्या संस्थांचा तपशिल सोबतच्या **प्रपत्र “अ”** मध्ये सोबत जोडण्यात आला आहे. सदर संस्थांना सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या विद्यमान तसेच नवीन संस्थेत नवीन/अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) संबंधित संस्थेस माध्यमिक शाळा संहिता १९८१ मध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहील. परवानगी प्राप्त झाल्यानंतर संस्थेला माध्यमिक शाळा संहिता व एम.ई.पी.एस. नियम १९८१ नुसार आवश्यक ते सर्व लेखे संस्था स्तरावर ठेवणे बंधनकारक राहील.संस्थेने माध्यमिक शाळा सहितेतील नियमांचे पालन न केल्यास अथवा शासनाने व संचालनालयाने दिलेल्या आदेशाचे, परिपत्रकाचे पालन न केल्यास संस्थेची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) मान्यता अभ्यासक्रमांच्या नविन/अधिकच्या तुकडया सुरु करण्यास कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३) मान्य अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना शासन / संचालनालय / संचालनालयाच्या अखत्यारीतील संबंधित कार्यालये यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४) शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले शिक्षण शुल्क विदयार्थ्यांकडून आकारणे संस्थेस बंधनकारक राहील. संस्थेस कमाल मर्यादेपेक्षा जास्त शुल्क विदयार्थ्यांकडून आकारता येणार नाही.

५) "**कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेले +२ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम**" असा सूचनाफलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सूचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांची संख्या व मंजूर प्रवेशक्षमता यांचा उल्लेख करण्यात यावा.

६) सदर अभ्यासक्रमांना कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमाकरीता संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा/वेतन व तदनुषंगिक बाबींची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. याबाबत शासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

७) मंजूर अभ्यासक्रमाकरीता आवश्यक शिक्षकीय कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, त्यांची किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबत संस्थेने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदींनुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तात्काळ करण्यात यावी व संबंधित जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी प्रवेश यादयांना मान्यता देण्यापूर्वी विहीत अर्हताधारक शिक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे याची खात्री करावी व त्यानंतरच प्रवेश यादयांना मान्यता दयावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयास, प्रादेशिक कार्यालयामार्फत सादर करावा.

८) भविष्यात सदरचे अभ्यासक्रम बंद करण्याबाबत किंवा त्यात काही बदल करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यास तो विनाअट व विनाविलंब संस्थेने अंमलात आणणे आवश्यक राहील.

९) अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांमधील प्रवेशाकरीता, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले सामाजिक/समांतर आरक्षण व इतर नियमांचे संस्थेने काटेकोरपणे पालन करावे व गुणानुक्रमे प्रवेश देण्यात यावेत.

१०) अभ्यासक्रमांना मंजूरी मिळाल्यानंतर सदर अभ्यासक्रम संस्थेत सुरू केल्याची माहिती संस्थेने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास तात्काळ दयावी व त्याबाबतची अनुषंगिक कार्यवाही करावी.

११) मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नविन तुकडयांची प्रवेशक्षमता प्रति तुकडी ५० इतकी असुन, मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास अश्या तुकडया सुरू ठेवण्याकरीता संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

१२) मान्यता प्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरु न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमाच्या तुकडीत सतत ३ वर्ष मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता प्रक्रिया नव्याने करणे आवश्यक राहील.

१३) शासनाने मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचा दर्जा व गुणवत्ता उच्च प्रतीचा राखण्याच्या दृष्टीने संचालनालय स्तरावरुन नियमितपणे प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रशिक्षण गुणवत्ता तपासण्यासाठी प्रत्येक वर्षी ७५% पेक्षा कमी निकाल असणाऱ्या संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात येईल. एखाद्या संस्थेचा निकाल सतत ३ वर्षामध्ये ७५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

१४) शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंर्तभूत करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१५) संबंधित संस्थेने त्यांच्याकडे भाषा/ जीवशास्त्र इत्यादी विषयाचे शिक्षक, मंजूर केलेल्या द्विलक्षी अभ्यासक्रमांच्या तुकडीमुळे अतिरिक्त ठरणार नाहीत याची खातरजमा करूनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

१६) व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत मंजूर व्यवसाय अभ्यासक्रमाच्या मंजूर तुकडीनुसार मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरिक्त अनधिकृत प्रवेश करता येणार नाही. याकरीता संस्थेस "महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यासक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३" लागू राहील.

१७) द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमातील विषयामध्ये शासनाने राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF) नुसार बद्दल केल्यास त्याप्रमाणे अभ्यासक्रम राबविणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१८) संबंधित संस्थेने त्यांच्याकडे भाषा/जीवशास्त्र इत्यादी विषयाचे शिक्षक, मंजूर केलेल्या द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या तुकडीमुळे अतिरिक्त ठरणार नाहीत याची खातरजमा करूनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

१९) विभागाच्या दि. ०७ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

२. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रपत्र "अ" नुसार मान्यता दिलेल्या संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू केले, याबाबत तसेच अभ्यासक्रमनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी शासनास सादर करावी.

३. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मधील अ.क्र. ६९ येथे नमूद संस्थेस +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम (NSQF रुपांतरीत नवीन जॉबरोल) सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे मानके व अटींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०७१०१०३६०२२००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRADEEP SAHEBRAO SHIVTARE

Digitally signed by PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
DN: CN = PRADEEP SAHEBRAO SHIVTARE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT
Date: 2025.07.10 10:51:05 +05'30'

**( प्रदीप सा. शिवतरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य, विधान भवन मुंबई.
६. मा.सभापती,विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, विधान भवन मुंबई.
७. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
१०.सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य, विधान भवन, मुंबई.
११. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव ,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अपर मुख्य सचिव ,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय,मुंबई
१४.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५.सर्व विभागीय शिक्षण उप संचालक, (शालेय शिक्षण विभाग), ( संचालनालयामार्फत )
१६.सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई / नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
१७. संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (संचालनालयामार्फत )
१८. संबंधित अशासकीय संस्था (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत )
१९. निवड नस्ती. (कौशल्य-२).

शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी २६२५/प्र.क्र.४१/कौशल्य-२, दिनांक: १० जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयासोबतचे जोडपत्र

शैक्षणिक सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी अभ्यासक्रमांच्या नविन संस्था/विद्यमान संस्थेत अधिकच्या तुकड्यांना कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेल्या संस्था

(प्रपत्र-अ)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | छ.संभाजीनगर | PBF240109405T | कै.अतुल शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड संचलित राजर्षी शाहू उच्च माध्य. विद्यालय, मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड. | गट ९ | ऑरगॅनिक ग्रॉअर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| २ | पुणे | PBF04613T | ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती संचलित शारदाबाई पवार विद्यानिकेतन, शारदानगर, बारामती, ता.बारमती पुणे. | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल<br>ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर | १ |
| ३ | नागपूर | PBF240108993T | स्नेहल एज्युकेशन मल्टीपर्पज सोसायटी संचलित स्नेहल पब्लिक स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज, तहसिल ऑफीस समोर, हिंगणा कान्होली बारा रोड, हिंगणा, नागपूर-४४ ११ १० | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| ४ | नागपूर | PBF240109119T | राधास्वामी विविध कार्यकारी शैक्षणिक संस्था संचलित आदर्श संस्कार विद्यालय ॲण्ड ज्यु. कॉलेज, हुडकेश्वर ते पिपळा ग्रामपंचायत रोड, पिपळा नागपूर. | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल<br>ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर | १ |
| | | | | गट २ | फिल्ड टेक्निशिअन-एअर कंडिशनर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| ५ | नाशिक | PBF70921T | आयुषी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आयुषी इंटरनॅशनल स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, मु.हगीणवेढे पोस्ट कोटमगाव, नाशिक. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| ६ | पुणे | PBF240108956T | बन्सीलाल रामनाथ आगरवाल चॅरिटे बल ट्रस्ट,पुणे संचलित विश्वकर्मा उच्च माध्यमिक विद्यालय, बुधवार पेठ, पुणे. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | मुंबई | PBF71009T | पायोनिअर एज्युकेशन टस्ट संचलित माटुंगा पायोनियर इंग्लिश स्कूल आणि ज्युनियर कॉलेज, जगजीवन निवान जीपी गोखले रोड, नॉर्थ दादर, पश्चिम. मुंबई. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| ८ | नागपूर | PBF70928T | श्री.महावीर मारवाडी स्कूल सोसायटी संचलित श्री.राजस्थान इंग्लिश ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स, विठ्ठल नगर, गोंदिया | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल<br>ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर | १ |
| ९ | नागपूर | PBF08736T | विद्याभारती संस्था वर्धा संचलित विद्याभारती कॉलेज, वर्धा एनएच-२०४, नागपुर वर्धा रोड, सेलू जि.वर्धा. | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल<br>ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर | १ |
| १० | पुणे | PBF77513T | श्री ज्योर्तीलिंग शिक्षण संस्था तलसंडे संचलित सोनाई ज्युनिअर कॉलेज, तलसंडे ता. हातकणंगले जि. कोल्हापुर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेररिफेरल | १ |
| ११ | पुणे | PBF08723T | पुरंधर हायर अँड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी संचलित पुणे कॅम्ब्रीज पब्लीक स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज, वाघापुर ता. पुरंधर जि. पुणे | गट २ | फिल्ड टेक्निशिअन-एअर कंडीशनर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेररिफेरल | १ |
| | | | | गट ७ | बिझनेस करस्पाँडट आणि बिझनेस फॅसीलेटर<br>डिस्ट्रिब्युटर सेल्समन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल्स | १ |
| १२ | अमरावती | PBF240108888T | ज्ञानसागर बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था यवतमाळ संचलित राज ज्युनिअर कॉलेज, किसन नगर, आर्णी रोड, यवतमाळ. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | अमरावती | PBF08761T | सौ.मायाताई ठाकरे शैक्षणिक आणि बहुउद्देशिय संस्था, नांदुरा संचलित सौ.मायाताई ठाकरे इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज,वडाळी,नांदुरा जि.बुलढाणा. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल्स | १ |
| १४ | पुणे | PBF70963T | कै. उद्धवराव तुलशीराम जाधवर फाऊंडेशन संचलित शार्दुल सुधाकरराव जाधवर कॉमर्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, मानाजीनगर नऱ्हे, पुणे . | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेररिफेरल | २ |
| | | | | गट ७ | बिझनेस करस्पॉडट आणि बिझनेस फॅसीलेटर<br>डिस्ट्रिब्युटर सेल्समन | १ |
| १५ | छ. संभाजीनगर | PBF240109331T | विश्वभारती जनसेवा प्रतिष्ठाण संचलित व्हिजन पब्लीक स्कुल, सोनपेठ जि. परभणी | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| १६ | नागपूर | PBF240109204T | युवकभारती शिक्षण संस्था पुलगाव संचलित ज्ञानभारती हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, पुलगाव, जि.वर्धा | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेररिफेरल | १ |
| १७ | नागपूर | PBF240109162T | जे. एन. टाटा पारसी गर्ल्स हायस्कुल संचलित, जे. एन. टाटा पारशी गर्ल्स हायस्कुल अँड ज्युनिअर कॉलेज, नागपूर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेररिफेरल | १ |
| १८ | नागपूर | PBF240109115T | व्हि एस पी एम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन नागपूर जवाहरलाल नेहरु विद्यालय ज्युनिअर कॉलेज वाडी, नागपूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेररिफेरल | १ |
| १९ | नागपूर | PBF70980T | सानंद शिक्षण संस्था संचलित जे. डी. कॉलेज, वासी ता. समुद्रपूर जि. वर्धा | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेररिफेरल | २ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | नागपूर | PBF240109193T | सिंधु एज्युकेशन सोसायटी जरीपटका नागपूर संचलित, महात्मा गांधी सन्टेनिअल सिंधु इंग्लिश प्रायमरी स्कुल, जरीपटका जि. नागपूर | गट १० | फ्लोरीकल्चरीस्ट<br>गार्डनर | १ |
| २१ | पुणे | PBF70992T | ज्ञानदीप शिक्षण संस्था टेम्भूर्णी संचालित, महात्मा फुले ज्युनियर कॉलेज, टेम्भुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल | २ |
| | | | | गट ९ | ऑरगेनिक ग्रोअर<br>इंरिगेशन सर्व्हिस टेक्नीशियन | २ |
| २२ | पुणे | PBF240109076T | शिवभूमी शिक्षण मंडळ संचालित शिवभूमी इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, सेक्टर २१, यमुनानगर, निगडी, पुणे | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल | १ |
| २३ | पुणे | PBF240109056T | गंगा ऐज्युकेशन सोसायटी संचालित, ज्ञानगंगा विश्व विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान आणि वाणिज्य, बाबूराव नगर, ता.सिन्नर, जि.पुणे. पिन. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल | १ |
| २४ | मुंबई | PBF08737T | श्रीमती नलिनी दोडे ज्युनियर कॉलेज, मुलुंड पूर्व-मुंबई. | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| २५ | मुंबई | PBF09095T | श्रीम. शामपतीदेवी मिश्रा एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आयरिस ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स धनीव बाग, मारुती सुझुकी शोरूमजवळ, पेल्हार रोड, नालासोपारा पूर्व. | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| २६ | पुणे | PBF240108915T | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे संचलित सौ.अरुंधती अरविंद ढवळे ज्युनिअर कॉलेज कन्याशाळा, शनिवार पेठ,सातारा | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| २७ | पुणे | PBF240109254T | प्रतिभा महिला प्रतिष्ठाण, पुणे संचलित द न्यू मिलेनियम इंग्लीश मिडीयम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, पिंपळगाव गुरव, नवी सांगवी,पुणे | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल | १ |
| २८ | पुणे | PBF08743T | सम्राट अशोक युवक मंडळ संचलित यशोधरा उच्च माध्यमिक विद्यालय, संजय गांधी नगर, विजापुर नाका, सोलापुर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल | १ |
| २९ | पुणे | PBF08745T | सम्राट अशोक युवक मंडळ संचलित यशोधरा उच्च माध्यमिक विद्यालय, संजय गांधी नगर, विजापुर नाका, सोलापुर | गट ७ | बिसनेस करस्पॉनडन्ट अँड बिसनेस फेसिलेटर<br>डिस्ट्रीब्युटर सेल्समन | १ |
| ३० | नागपुर | PBF08867T | सोमलवार ॲकॅडमी एज्युकेशन सोसायटी संचलित सोमलवार ज्युनिअर कॉलेज, निकालस ब्रँच, राणाप्रताप नगर रोड, खामला, नागपूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कॉम्प्युटींग पेरीफेरल्स | १ |
| | | | | गट ७ | बिझनेस कॉरस्पॉडन्स अँड फॅसिलेटर<br>डिस्ट्रीब्यूटर सेल्समन | १ |
| ३१ | नागपुर | PBF०८७४०T | धर्मपेठ एज्युकेशन सोसायटी संचलित आर.एस.मुंडले इंग्लिश स्कूल अँड ज्युनि.कॉलेज, समर्थ नगर (प), वर्धा रोड, नागपूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कॉम्प्युटींग पेरीफेरल्स | १ |
| ३२ | नागपुर | PBF08754T | सोमलवार ॲकॅडमी एज्यु.ॲकॅडमी संचलित सोमलवार ज्युनि.कॉलेज, सेंट्रल बाजार रोड, रामदास पेठ, नागपूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कॉम्प्युटींग पेरीफेरल्स | १ |
| ३३ | छ.संभाजीनगर | PBF240108987T | ओरचिड ज्युनिअर कॉलेज, एमआयडीसी, वाळुज ता.जि. छ.संभाजीनगर | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | छ.संभाजीनगर | PBF240109017T | रेणुकामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माऊली ज्ञानतीर्थ जू कॉलेज मु. पो. टाकली /खू /ता. जि. परभणी | गट ४ | फील्ड टेक्निशियन-एअर कंडिशनर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ३५ | मुंबई | PBF08832T | सहज जिवन एज्युकेशन ट्रस्ट संचलित एसएस उच्च माध्यमिमक शाळा आणि ज्युनिअर कॉलेज, सीवूडस, नेरुळ, नवी मुंबई. | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ३६ | मुंबई | PBF240108882T | जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संचलित रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, सेक्टर ३३, पेठ पाडा,खारघर, नवी मुंबई. | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ३७ | मुंबई | PBF240109093T | श्री हरी एज्युकेशनल ट्रस्ट संचलित सेंट रॉक्स ज्युनियर कॉलेज, चिकुवाडी, ऑफ लिंक रोड, बोरिवली पश्चिम | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ३८ | मुंबई | PBF70925T | राहुल एज्युकेशन सोसायटी संचलित एलआर तिवारी ज्युनियर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स श्री एलआर तिवारी शैक्षणिक कॅम्पस, मीरा रोड (पूर्व) ४०११०७ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | ६ |
| ३९ | मुंबई | PBF71010T | पायोनियर एज्युकेशन ट्रस्ट संचलित पायोनियर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स,आकुर्ली क्रॉस रोड क्रमांक ३, कांदीवली ,मुंबई ४००१०१ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ४० | मुंबई | PBF240108889T | सुदर्शन रामकिसुन शिक्षण संस्था संचालित सुदर्शन इंग्लिश हायस्कूल ज्युनिअर कॉलेज धानिव बाग, नालासोपारा, पुर्व जि.पालघर ४०१२०९ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ४१ | मुंबई | PBF70990T | ठाकूर श्यामनारायण हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय संचालित ठाकूर श्यामनारायण हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय ठाकूर हाऊस, अशोक नगर, कांदिवली पूर्व-४००१०१ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ४२ | मुंबई | PBF77516T | वाडा निर्मिती एज्युकेशन सोसायटी संचालित वाडा निर्मिती एज्युकेशन सोसायटी WNES परिसर, वाडा परळी रोड, हरोसाळे येथे, तालुका वाडा, जिल्हा पालघर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ४३ | छ.संभाजीनगर | PBF08726T | विमुक्त जाती सेवा समिती मुदखेड संचलित सेवादास सेकंडरी ॲण्ड हायर सेकंडरी स्कूल, वसंतनगर, मुदखेड ता.मुदखेड जि.नांदेड ४३१७१५ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ४४ | छ.संभाजीनगर | PBF08748T | राजश्री शाहू महाराज बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था, लातूर संचलित आर.एन.मोटेगावकर उच्च माध्यमिक विद्यालय, उद्योग भवन, अष्टविनायक रोड, लातूर४१३५१२ | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| ४५ | छ.संभाजीनगर | PBF240108921T | लोणार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री मोरेश्वर ज्युनियर कॉलेज पो.गंगामसला ता.मालजगांव जि.बीड | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ४६ | छ.संभाजीनगर | PBF240108997T | वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित शांताबाई नखाते माध्यमिक वि.उच्च माध्यमिक विद्यालय at.po पाथरी जि परभनी ४३१५०६ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ४७ | छ.संभाजीनगर | PBF240109190T | भगवानबाबा शिक्षण प्रसारक व सामाजिक संस्था अनसुर्डा संचलित प्रभाकर बोंदर विद्यालय आणि ज्यु. कॉलेज mseb ऑफिस जवळ, संभाजी नगर, बेंबळी, ता. जि. धाराशिव | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल | १ |
| ४८ | छ.संभाजीनगर | PBF08805T | भारत लिबरल एज्युकेशन सोसायटी , उदगीर संचलित श्री.हवगीस्वामी ज्युनिअर कॉलेज, उदगीर ता.उदगीर जि.लातूर ४१३ ५१७ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ४९ | छ.संभाजीनगर | PBF71042T | श्री लालबहादूर शास्त्री शिक्षण संस्था संचलित यशवंत हायस्कूल ज्युनियर कॉलेज उमरी ता. उमरी जि. नांदेड. | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | २ |
| ५० | छ.संभाजीनगर | PBF71044T | विद्यालंकार शिक्षण वि क्रीडा प्रसारक मंडळ, परभणी संचलित श्री चक्रधर स्वामी ज्युनियर कॉलेज मु.पो. धार ता जि. परभणी | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स | १ |
| ५१ | छ.संभाजीनगर | PBF71041T | श्री लालबहादूर शास्त्री शिक्षण संस्था, उमरी संचलित श्री शाहू महाराज कनिष्ठ महाविद्यालय भोकर ता.उमरी जि.नांदेड | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | २ |
| ५२ | अमरावती | PBF240109373T | दिवंगत पद्मादेवी आर. मालू फाउंडेशन संचलित हरिकीशन मालू इंटरनॅशनल स्कूल, देशमुख लॉन समोर, शेगाव-रहाटगाव रोड, अमरावती ४४४६०३ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | २ |
| ५३ | अमरावती | PBF240109328T | माऊली बहुउद्देशीय संस्था, संचालित माऊली सायन्स कॉमर्स अँड आर्ट्स कॉलेज लाखनवाडा ता. जि. अकोला ४४४००२ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ५४ | नागपूर | PBF71049T | राष्ट्रहित बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचालित महात्मा गांधी ज्युनियर कॉलेज मुडलियार लेआउट इंदिरा गांधी पुतळ्याजवळ शांतीनगर नागपूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ५५ | नागपूर | PBF240109030T | श्री ऋषिप्रसाद बहुद्देशीय शिक्षण संस्था संचालित श्री कला, वाणिज्य आणि विज्ञान ज्युनियर कॉलेज अंजी ता.जि. वर्धा | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्व्हीस टेक्निशियन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ५६ | नागपूर | PBF240108885T | श्रीशरद ग्रामीण विकास बहुदेशीय शिक्षण संस्था देवळी, जिल्हा वर्धा संचालित मारिया उच्च माध्यमिक मराठी कला आणि विज्ञान महाविद्यालय, देवळी जिल्हा वर्धा देवळी पोस्टवर, तहसील ऑफिस जवळ, पुलगाव रोड, देवळी ता. देवळी जि. वर्धा | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्व्हीस टेक्निशियन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ५७ | नागपूर | PBF240108914T | नवनिर्माण शिक्षण संस्था संचालित गायत्री हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज नवीन नंदनवन नागपूर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ५८ | नागपूर | PBF240109016T | विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट संचालित विद्या विकास ज्यु.कॉलेज समुद्रपूर जि. वर्धा तुळसकर रुग्णालयाजवळील दत्त मंदिर वॉर्ड, हिंगणघाट जिल्हा वर्धा | गट १० | फ्लोरीकल्चरीस्ट (ओपन कल्टीवेशन)<br>गार्डनर | १ |
| ५९ | नागपूर | PBF77507T | विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट संचालित विद्या विकास कनिष्ठ महाविद्यालय हिंगणघाट, संत तुकडोजी वार्ड, नादोरी रोड, ता. हिंगणघाट जिल्हा वर्धा | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| | | | | गट १० | फ्लोरीकल्चरीस्ट (ओपन कल्टीवेशन)<br>गार्डनर | १ |
| | | | | गट ७ | बिसनेस करस्पॉनडन्ट अँड बिसनेस फेसिलेटर<br>डिस्ट्रीब्युटर सेल्समन | १ |
| ६० | छ.संभाजीनगर | PBF70956T | औरंगाबाद खत्री अल्पभाषिक शिक्षण संस्था संचलित विद्याशिल्प पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गंगापुर जहागीर ता.जि. छ.संभाजीनगर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ६१ | छ.संभाजीनगर | PBF240109270T | शिवशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ बिजेवाडी तालुका कंधार जि नांदेड संचलित शिवशक्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काकांडी, ता.जि.नांदेड | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |
| ६२ | मुंबई | PBF240109039T | श्री गंगासहाई रामप्रताप त्रिवेदी एज्युकेशन सोसायटी संचलित अरिहंत स्कूल अॅण्ड कॉमर्स अॅण्ड सायन्स ज्युनिअर कॉलेज, मिरा, जि.ठाणे | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ६३ | मुंबई | PBF70974T | कृष्णा एज्युकेशन सोसायटी संचलित राहूल इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेज ऑफ कामर्स ॲण्ड सायन्स, खैरा सारवली, बोईसर पश्चिम ता.डहाणू जि.पालघर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफिरल्स | २ |
| ६४ | पुणे | PBF240109159T | महाराष्ट्र अभियांत्रिकी आणि शैक्षणिक संशोधन अकादमी पुणे संचालित एमआयटी वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज देहू फाटा, गजानन महाराज मंदिर आळंदी (डी) समोर, ता.खेड, जिल्हा पुणे, | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफिरल्स | १ |
| | | | | गट २ | फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफिरल्स<br>फील्ड टेक्निशियन-एअर कंडिशनर | १ |
| ६५ | पुणे | PBF08730T | पलुस शिक्षण प्रसारक मंडल पलुस संचालित इंग्रजी माध्यम विद्यालय आणि ज्यूनियर कॉलेज, पलुस ता.पलुस जि.सांगली. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफिरल्स | १ |
| ६६ | मुंबई | PBF70993T | श्रीमती केएलटी एज्युकेशन सोसायटी संचालित मदर मेरीज इंग्लिश हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स आचोळे रोड यशवंत विवा टाऊन शिप नालासोपारा, जि. पालघर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फील्ड टेक्निशियन-संगणक आणि पेरिफिरल्स | १ |
| ६७ | मुंबई | PBF70970T | के.एल.टी एज्युकेशन सोसायटी संचलितश्रीमती के.एल.टी. ज्यु.कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स, सव्हे नं १८०, श्रीप्रस्थ रोड,नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कॉम्प्युटींग पेरीफेरल्स | १ |
| ६८ | नागपूर | PBF70982T | विद्याप्रबोधनी बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित सेंट्रल प्रोव्हींन्शिअल स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज,बॅनर्जी ले-आऊट रमेश वारी, नागपूर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल | १ |
| ६९ | नागपूर | PBF240109376T | भारतीय विद्या प्रसारक संस्था संचलित नुतन भारत ज्युनिअर कॉलेज, अभ्यंकर नगर, नागपूर. | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोअर<br>इरिगेशन सर्विस टेक्नीशियन | १ |

PRADEEP SAHEBRAO SHIVTARE

Digitally signed by PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
DN: CN = PRADEEP SAHEBRAO SHIVTARE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT
Date: 2025.07.10 10:51:18 +05'30'